# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 01 /02/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

**प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ** :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

महाराष्ट्र पोलीस

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिब/पो.कर्म-हजर/ 2020 | 1396

पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ

दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710

Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

यवतमाळ, दिनांक :- 31 JAN 2020

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र क्रमांक पोअय/आली/-80सी/आंजिब/13692/2019 दिनांक 05/12/2019 अन्वये **पोशि/14259 दानिश युनूस शेख** यांना या आस्थापनेवर **पोलीस शिपाई** या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार मा.पोलीस आयुक्त, नागपुर यांचे पत्र क्रमांक पोआना/आस्था/सआली-02/कार्यमुक्त/आंजिब/2020 दिनांक 09/01/2020 अन्वये नमुद पोलीस कर्मचारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 29/01/2020 रोजी म.नंतर हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

**पोशि/14259 दानिश युनूस शेख** यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन **2699** देण्यात येवुन त्यांची नेमणुक, पो.स्टे पुसद ग्रामीण येथे करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

पोशि/14259 दानिश युनूस शेख नेमणुक, पो.स्टे पुसद ग्रामीण

**मार्फत :-** ठाणेदार पो.स्टे पुसद ग्रामीण

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-5/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक /वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- मा.पोलीस आयुक्त नागपुर शहर

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिंब/पो.कर्म-हजर/2020 /1395
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 31 JAN 2020

---

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र क्रमांक पोअय/आली/-80सी/आंजिब/मडावी/13809/2019 दिनांक 07/12/2019 अन्वये **पोना/2180 प्रमोद मडावी** यांना या आस्थापनेवर **पोलीस शिपाई** या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्रमांक डि-28/आंजिब-यवतमाळ/कार्यमुक्त/पोना-2180/2020 दिनांक 24/01/2020 अन्वये नमुद पोलीस कर्मचारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 26/01/2020 रोजी म.नंतर हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

**पोना/2180 प्रमोद मडावी** यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन **907** देण्यात येवुन त्यांची नेमणुक, जिल्हा वाहतुक शाखा, वणी येथे करण्यात येत आहे.

**(एम.राज कुमार)**
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

पोशि/907 प्रमोद मडावी नेमणुक, जिल्हा वाहतुक शाखा, वणी

**मार्फत :-** प्रभारी अधिकारी जिल्हा वाहतुक शाखा, वणी

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-2/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक /वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- पोलीस अधिक्षक, गडचिरोली

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

महाराष्ट्र पोलीस

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिंब/पो.कर्म-हजर/2020/1393

पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ

दूरध्वनी क्रमांक.:- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710

Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

यवतमाळ, दिनांक :- 31 JAN 2020

---

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र क्रमांक पोअय/आली/-80सी/आंजिब/आडे/1381/2019 दिनांक 07/12/2019 अन्वये **पोशि/158 निरंजन आडे** यांना या आस्थापनेवर **पोलीस शिपाई** या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पोलीस अधिक्षक, लोहमार्ग औरगांबाद यांचे पत्र क्रमांक पोअलोऔ/आस्थापना/आंजिब/675/2020 दिनांक 27/01/2020 अन्वये नमुद पोलीस कर्मचारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 29/01/2020 रोजी म.नंतर हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

**पोशि/158 निरंजन आडे** यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन **991** देण्यात येवुन त्यांची नेमणुक, पो.स्टे खंडाळा येथे करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

पोशि/991 निरंजन आडे नेमणुक, पो.स्टे खंडाळा

**मार्फत :-** ठाणेदार पो.स्टे खंडाळा

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-2/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक /वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- पोलीस अधिक्षक, लोहमार्ग औरगांबाद

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

# भाग २ - रजा

क्रमांक :- पोअय/सआली-1/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/ 1459 /2020 यवतमाळ, दिनांक :- 1 FEB 2020

विषय :- हजर करुन घेणे बाबत

--- 000 ---

**पोहवा/1534 संजय मोहतुरे नेणमुक पो.स्टे.दारव्हा** हे दि.25/09/2019 ते 01/02/2020 (128 दिवस) सिक रजेवर होते. ते दिनांक 1/02/2020 रोजी कर्तव्यावर हजर होणे करीता आले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधिल नियम (61) नुसार त्यांचा दिनांक 25/009/2019 ते 01/02/2020 पर्यंतचा सिक कालावधी खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

25/09/2019 ते 01/02/2020 परावर्तीत रजा 128 दिवस

**(मा.पो.अधि.यांचे आदेशान्वये)**

(पी.के.गिरोलीकर)
प्र.कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक यवतमाळ,करीता.

प्रति, ठाणेदार:- पो.स्टे.दारव्हा

प्रत:- वेतन लिपीक 01/डिपीजी लिपीक यांना माहिती योग्य त्या कार्यवाहिस्तव

1422

क्रमांक : पोअय/सआली-२/बालसंगोपण रजा/मपोशि-१३३५,१०७१/२०२०, यवतमाळ दिनांक

1 FEB 2020

**आदेश**

शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : सकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६ दिनांक २३.०७.२०१८ चे शासननिर्णयानुसार खालील नमुद महिला पोलीस कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांच्या मुलगा/मुलीच्या संगोपणाकरीता विशेष बालसंगोपन रजा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | महिला पो. कर्म नाव व पदनाम ब.न. | नेमणुक | अपत्याची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | मंजुर बालसंगोपन रजा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१०७१ सुचिता अकोट | AUTH | १ | पहिल्या अपत्या करीता | दि.०१.०२.२०२० ते दि.०१.०४.२०२० पर्यंत |
| २ | मपोशि/१३३५ सुषमा मंगल वाढई | पो.स्टे. मुकुटबन | १ | पहिल्या अपत्या करीता | दि.०१.०२.२०२० ते दि.०१.०४.२०२० पर्यंत |

**अटी व शर्ती**

१) मुलाचे वय १८ वर्ष होईपर्यंत रजा लागु राहील.

२) एका वर्षामध्ये कमाल दोन महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा लागु राहील.

३) पहील्या ०२ जेष्ठतम हयात मुलाकरीता सदर रजा लागु राहील.

४) उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपण रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल

५) सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरणार नाही.

**(मा. पोलीस अधिक्षक यांचे मान्यतेने)**

**( पी. के. गिरोलीकर )**
(प्र.) कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

ठाणेदार ,पो.स्टे. उमरखेड., AUTH

२) सदर रजेबाबत नमुद मपोशि/१०७१ सुचिता अकोट , मपोशि/१३३५ सुषमा वाढई यांना बालसंगोपण रजेबाबत समज दयावी .

**प्रत माहितीस व कार्यवाहीस,**

वेतन लिपीक-१/डिपीजी लिपीक आस्थापना शाखा, पो.अ. कार्यालय यवतमाळ.

1437 1 FEB 2020

क्रमांक: आशा-५/५१-डी/ परावर्तीत रजा/विविध/२०२०/ यवतमाळ दिनांक-

**आदेश**

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा म.ना.से.रजा.नियम १९८१ चे नियम क्रमांक(६१)व (५१)अन्वये नमुद वैदयकीय कालावधी हा परावर्तीत व अर्जीत रजेत रूपांतरीत करण्यात येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | नेमणुक पो.स्टे | उपभोगलेला कालावधी दिवस | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १ | पोशी/२६३१,अरूणा पायलवार | वडकी | दि.१६/८/२०१९/त ३/९//२०१९/ १९ दिवस | परावर्तीत रजा |
| २ | मपोशी/२५४१,जयश्री गोडे | पारवा | दि.२३/८/२०१९ते १३/९/२०१९/ २२ दिवस | परावर्तीत रजा |
| ३ | पोकॉ/२७०३,उध्दव घुगे | वडकी | दि.६/८//१९/ते १६/८/२०१९/ १० दिवस | परावर्तीत रजा |
| ४ | पोकॉ/२७०३,उध्दव घुगे | वडकी | दि.४/९//२०१९/ते १२/९/२०१९/ ८ दिवस | परावर्तीत रजा |
| ५ | मपोशी/२६३१,अरूणा पायलवार | वडकी | दि.६/१०/२०१९/ते २०/१०/२०१९/ १४ दिवस | परावर्तीत रजा |
| ६ | पोकॉ/२३०१,शैलेद्र जिददेवार | यवतमाळ शहर | दि.७/११/१९/ते११/११/२०१९/ ३ दिवस | परावर्तीत रजा |
| ७ | मपोशी/२६३३,वैशाली मिसाळ | घांटजी | दि.१५/९/१९/ते ४/१०/२०१९/ १९ दिवस | परावर्तीत रजा |
| ८ | पोकॉ/२५१२,गजानन गोंडबे | वणी | दि.१५/७/१९/ते २८/७/२०१९/ १४ दिवस | परावर्तीत रजा |
| ९ | पोकॉ/२६४८,अविनाश खाडे | ---//--- | दि.२७/७/१९/ते ३/८/२०१९/ ८ दिवस | परावर्तीत रजा |
| १० | पोशी/२५३९,अविनाश पवार | पो.मुख्यालय | दि.४/१/२०/ते१४/११/२०२०/ १०दिवस | परावर्तीत रजा |

३१.१.

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक(मुख्या)
पोलिस अधीक्षक यवतमाळ करिता

प्रति,

वरील सबंधीत सर्व ठाणेदार.

प्रत -वेतन लिपीक-1यांना व्दिप्रतीत/डीपीजी लीपीक यांना आवश्यक कार्यवाही

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

1 FEB 2020

क्रमांक:सआली-५/५१-डी/पोकॉ/२४५६/वेतन रोखने बाबत /२०२० 1463 यवतमाळ दिनांक

आदेश

**मपोशी /२४५६,शिवानी काळे नेमणुक -पो.स्टे.अवधुतवाडी** दिनांक -२२/११/२०१९ पासुन आज पावेतो अनधिकृपणे गैरहजर आहेत . त्यांचे वेतन त्वरीत रोखण्यात यावे.
**(मा.पो.अ.यांचे आदेशान्वये)**

1.2.

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक.(मुख्या)
पोलीसअधिक्षक यवतमाळ करिता

प्रति,

पोनि,पो.स्टे अवधुतवाडी / वेतन लिपीक/डीपीजी लीपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

क्रमांक :- पोअय/आलि 80-सी/कायमपणाचे फायदे/ 1384/2020 यवतमाळ, दिनांक :- 31 JAN 2020

## आदेश

संदर्भ :- शासन निर्णय क्र.सा.प.वि.क्रमांक एसआरव्ही-1075/10, दिनांक 19/01/1975

विषय :- दिनांक 19 सप्टेंबर 1975 च्या परिच्छेद 3 अनुसार स्थाईत्व प्रमाणपत्र

वरील विषयानुसार व संदर्भाकिंत शासन परिपत्रकान्वये प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-1075/दहा, दिनांक 19/09/1975 मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती पुढील विवरण पत्रात नमुद करण्यात आलेल्या अस्थाई कर्मचा-यांच्या बाबतीत पुर्ण झालेल्या आहेत.

खालील नमुद पोलीस कर्मचारी सर्व प्रयोजनार्थ त्या विवरणपत्रात त्यांच्या नावासमोर स्तंभ 6 मध्ये नमूद केलेल्या पदावरील स्तंभ 7 मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासुन स्थाई कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहेत.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी यांचे नाव | बंन | पदनाम | सेवेत नेमणुकीचा दिनांक | ज्या पोलीस कर्मचा.यास ज्या पदावर स्थायित्व देण्यात येत आहे ते पद | कायमपणाचे फायदे देय ठरत असल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | गिरजप्पा वळीराम मुसळे | 1681 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 2 | प्रांजली दादाजी गावंडे | 1406 | पोलीस शिपाई | 09/09/2016 | पोलीस शिपाई | 09/09/2019 |
| 3 | प्रकाश विश्वनाथ केंन्द्रे | 1384 | पोलीस शिपाई | 06/10/2016 | पोलीस शिपाई | 06/10/2019 |
| 4 | सचिन अशोक सालफळे | 1773 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 5 | रविंद्र गोविंद खंडारे | 1510 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 6 | अशोक राजु जाधव | 523 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 7 | दिपाली दिनेश गच्चे | 967 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 8 | प्रविण प्रकाश वैद्य | 1364 | पोलीस शिपाई | 09/09/2016 | पोलीस शिपाई | 09/09/2019 |
| 9 | ज्योती दत्तुसिंग राठोड | 1760 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 10 | प्रेमानंद रामदास जेंगढे | 2672 | पोलीस शिपाई | 22/07/2016 | पोलीस शिपाई | 22/07/2019 |
| 11 | वैजनाथ विश्वनाथ पडघान | 640 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 12 | योगेश नानाजी डोंगरे | 946 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 13 | हेमराज नारायण गिते | 846 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 14 | अगस्ती किशोरराव पुंडे | 1947 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 15 | संकेत प्रकाशराव बोपचे | 1257 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 16 | गजानन संग्राम गिते | 924 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 17 | दिपक सुखदेव राठोड | 954 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 18 | मोनेश्वर सुरेश खंडारे | 1362 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 19 | कोंडाबाई नामदेव केंन्द्रे | 1444 | पोलीस शिपाई | 08/10/2016 | पोलीस शिपाई | 08/10/2019 |
| 20 | जयश्री विलास पवार | 1279 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 21 | संघशिल नंदकुमार टेंभरे | 1652 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 22 | मोनिका मुंगसाजी राऊत | 1319 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 23 | मोहीणी विजय शिंदे | 859 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 24 | सपना सिध्दार्थ खरतडे | 1302 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 25 | रोहीणी सिध्दार्थ वाकोडे | 671 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 26 | शारदा वासुदेव देठे | 1464 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 27 | वनिता रामराव पवार | 659 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 28 | रीशी बाबुसा लांजेवार | 68 | पोलीस शिपाई | 16/12/2016 | पोलीस शिपाई | 16/12/2019 |
| 29 | संतोष लक्ष्मणराव मेंढे | 1563 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 30 | जिवनसिंग किसनसिंग बैस | 1602 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 31 | नागेश्वर भुमन्ना बुरेवार | 1524 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 32 | ललीत रामकृष्ण नवघरे | 1912 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 33 | सागर संदिप दिपेवार | 1181 | पोलीस शिपाई | 10/09/2016 | पोलीस शिपाई | 10/09/2019 |
| 34 | यशवंतगिर विलासगिर गिरी | 522 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 35 | पुजा चंद्रभान जुमनाके | 1478 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 36 | चंद्रकला दशरथ जाधव | 1321 | पोलीस शिपाई | 06/10/2016 | पोलीस शिपाई | 06/10/2019 |
| 37 | नलिनी ज्ञानेश्वर धोटे | 1550 | पोलीस शिपाई | 06/10/2016 | पोलीस शिपाई | 06/10/2019 |
| 38 | गजानन शत्रुघ्न कुडमेथे | 1309 | पोलीस शिपाई | 09/09/2016 | पोलीस शिपाई | 09/09/2019 |
| 39 | मालती रमेश तरोणे | 1351 | पोलीस शिपाई | 06/10/2016 | पोलीस शिपाई | 06/10/2019 |
| 40 | रंजना पांडुरंग मसराम | 1330 | पोलीस शिपाई | 09/09/2016 | पोलीस शिपाई | 09/09/2019 |
| 41 | राहुल विश्वेश्वर मडावी | 1271 | पोलीस शिपाई | 12/09/2016 | पोलीस शिपाई | 12/09/2019 |
| 42 | प्रशांत पांडुरंग राठोड | 1414 | पोलीस शिपाई | 06/10/2016 | पोलीस शिपाई | 06/10/2019 |
| 43 | पपीता मारोती दुधकोहळे | 1174 | पोलीस शिपाई | 09/09/2016 | पोलीस शिपाई | 09/09/2019 |
| 44 | इम्रानखान युनुसखान पठाण | 1256 | पोलीस शिपाई | 14/09/2016 | पोलीस शिपाई | 14/09/2019 |
| 45 | मनिषा किसन मुंडेकर | 1164 | पोलीस शिपाई | 09/09/2016 | पोलीस शिपाई | 09/09/2019 |
| 46 | मोहंमद आसीर मोहंमद नासीर | 1359 | पोलीस शिपाई | 06/10/2016 | पोलीस शिपाई | 06/10/2019 |
| 47 | सुनिल देवन्ना नलगंटीवार | 1906 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 48 | आसिफखान साहेबखान पठाण | 55 | पोलीस शिपाई | 18/07/2016 | पोलीस शिपाई | 18/07/2019 |
| 49 | गजानन आत्माराम साखरकर | 587 | पोलीस शिपाई | 17/11/2016 | पोलीस शिपाई | 17/11/2019 |
| 50 | अतुल गणेश मानेकर | 591 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 51 | धनराज दत्तु गव्हाणे | 1300 | पोलीस शिपाई | 14/10/2016 | पोलीस शिपाई | 14/10/2019 |
| 52 | आकाश् शेषराव गावंडे | 703 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 53 | विजय प्रकाश गुजर | 895 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |
| 54 | सारीका गौतम भगत | 1799 | पोलीस शिपाई | 31/08/2016 | पोलीस शिपाई | 31/08/2019 |

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

आस्थापना लिपीक 1,2,3,4,5

प्रत :- राजपत्र लिपीक यांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव

1 FEB 2020

क्रमांक :- पोअय/आस्था-3/अ.र. रोखीकरण./ 1425 /2020 यवतमाळ दिनांक :-

## आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 नियम 50 (1) बी व नियम क्रमांक 68 (1) मधिल तरतुदि नुसार तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अ.रजा-2401/सेवा-9 दिनांक 15.01.2001 अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या अर्जीत रजे खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेचे रोखीकरण करण्यात मंजुरी देण्यात येत आहे

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त/मयत दिनांक | शिल्लक रजा | शेवटचे वेतन |
|---|---|---|---|---|
| 01 | .से.नि. सपोउपनि/1411 सुरेष खंडारे | 30.06.2019 | 300 दिवस | 46800/- |

( एम. राज कुमार )
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

वेतन लिपीक - 1 यां-ना योग्य कार्यवाही करीता

प्रत :-जिल्हा कोषागार अधिकारी /पेन्शन लिपीक/राजपत्र लिपीक यांना माहितीस योग्य कार्यवाहिस्तव

क्रमांक :- पोअय/आस्था-3/अ.र. रोखीकरण./ 1424 /2020 यवतमाळ दिनांक :- 1 FEB 2020

## आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 नियम 50 (1) बी व नियम क्रमांक 68 (1) मधिल तरतुदि नुसार तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अ.रजा-2401/सेवा-9 दिनांक 15.01.2001 अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या अर्जीत रजे खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेचे रोखीकरण करण्यात मंजुरी देण्यात येत आहे

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त/मयत दिनांक | शिल्लक रजा | शेवटचे वेतन |
|---|---|---|---|---|
| 01 | से.नि. सपोउपनि/1156 विजय महल्ले | 30.06.2019 | 300 दिवस | 48200/- |

( एम. राज कुमार )
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,
वेतन लिपीक - 1 यां-ना योग्य कार्यवाही करीता

प्रत :-जिल्हा कोषागार अधिकारी /पेन्शन लिपीक/राजपत्र लिपीक यांना माहितीस योग्य कार्यवाहिस्तव

क्रमांक :- पोअय/आस्था-3/अ.र. रोखीकरण./ 1423 /2020 यवतमाळ दिनांक :- 1 FEB 2020

## आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 नियम 50 (1) बी व नियम क्रमांक 68 (1) मधिल तरतुदि नुसार तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अ.रजा-2401/सेवा-9 दिनांक 15.01.2001 अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या अर्जीत रजे खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेचे रोखीकरण करण्यात मंजुरी देण्यात येत आहे

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त/मयत दिनांक | शिल्लक रजा | शेवटचे वेतन |
|---|---|---|---|---|
| 01 | स्वे. से.नि. सपोउपनि/1153 श्रीकृष्ण चरडे | स्वे.से.नि. 27.06.2019 | 300 दिवस | 46800/- |

( एम. राज कुमार )
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,
वेतन लिपीक - 1 यां-ना योग्य कार्यवाही करीता

प्रत :-जिल्हा कोषागार अधिकारी /पेन्शन लिपीक/राजपत्र लिपीक यांना माहितीस योग्य कार्यवाहिस्तव

# भाग ४ - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक :- डीपी/३१-बी/ फेरअपिल अं.आ./ 1458 /२०१९ यवतमाळ दि. 1 FEB 2020

संदर्भ :- पोमस यांचे आदेश क्र.
पोमसं/१३/२२/११/(मोहाडे-यवतमाळ)/३४६/२०१९ मुंबई दि.१६/१/२०२०

विषय :- फेर अपिल अंतिम आदेश तामिल बाबत
पोना/१४८४ रत्नपाल मोहाडे,नेमणुक पो.स्टे.वणी जि.यवतमाळ

-----ooo-----

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, पोना/१४८४ रत्नपाल मोहाडे,नेमणुक पो.स्टे.वणी यांना पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील वरील संदर्भानुसार फेरअपिल अंतिम आदेश तामील करीता प्राप्त झालेली आहे.सोबत फेर अपिल आदेशाच्या दोन प्रती पाठविण्यात येत आहे. प्रभारी अधिकारी यांनी मुळ प्रत पोना/१४८४ रत्नपाल यांना त्वरीत अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घ्यावी.सदरची दुय्यम प्रत **दिनांकीत स्वाक्षरीसह ०३ दिवसाचे आत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.**

सहपत्र :- फेर अपिल अंतिम आदेश प्रत.

(पी.के.गिरोलीकर)
प्र. कार्यालय अधिक्षक,
पो.अ.कार्या.यवतमाळ

प्रति,
पोना/१४८४ रत्नपाल मोहाडे,नेमणुक पो.स्टे.वणी जि.यवतमाळ

मार्फत - प्रभारी अधिकारी,पो.स्टे.वणी

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत → वेतन । / डीपीजी लिपिक/ आस्था. लिपिक/ सआली - ७/
यांना माहितीस व उचित कार्यवाहीस

क्रमांक : पोमसं/१३/२२/११/(मोहाडे-यवतमाळ)/३४६/२०१९ मुंबई, दिनांक - १६/०१/२०२०.

वाचा :- १) पोना.१४८४/रत्नपाल मोहाडे, नेम. पोलीस स्टेशन, वणी, जि.यवतमाळ यांच्या कसूरीची कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे अंतिम आदेश क्र.डीपी/३१-बी-२/१४८४ मोहाडे, २५१९ शेंडे /अं.आ./३७२१/२०१९, दि.२७/०३/२०१९.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपिल आदेश क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ /अंआ/पोना-मोहाडे, पोशि-शेंडे/२०१९/३३६१, दि.२३/०७/२०१९.

४) पोना.१४८४/रत्नपाल मोहाडे, नेम. पोलीस स्टेशन, वणी, जि.यवतमाळ यांचा दि.२७/०९/२०१९ चा फेर अपिल अर्ज.

********

**-: कसूरी :-**

आपण दि.२८/०१/२०१९ रोजी पो.स्टे.आवारात दक्षता हॉल वर असलेल्या पोलीस लोगो चे व पो.स्टे.आवारात इतर शुटींग घेत असलेल्या झी.न्युज चे पत्रकार श्रीकांत राऊत व कॅमेरामॅन यांना तुम्ही कोण आहात ? पो.स्टे.परीसरातील ही शुटींग तुम्ही कोणाच्या आदेशान्वये करता? असे विचारणा केली. त्यावर पत्रकार यांनी त्यांची ओळख सांगितली. पत्रकार यांनी आपली विचारणा केली असता आपण आपले नाव सांगुन पो.स्टे.वणी येथे पोलिस असल्याचे सांगितले. त्यानंतर कॅमेरामॅन ला नाव विचारुन शुटींग थांबविण्यास सांगितले असता त्यांनी तसे केले नाही म्हणुन पत्रकार श्रीकांत राऊत व कॅमेरामॅन यांना पकडले. तसेच त्यांचेशी शाब्दीक बाचाबाची करुन असभ्य वर्तन केले. तसेच त्यांना उध्दटपणे वागणुक दिली. पोलिसांनी केलेल्या वर्तनाचे प्रसार माध्यमात व यु टुब वर क्लीप व्हायरल झाली. अशाप्रकारच्या असभ्य वर्तनामुळे पोलिसांची प्रतिमा जनमाणसात मलीन झाली.

२. अपिलार्थी पोना.१४८४/रत्नपाल मोहाडे, नेम. पोलीस स्टेशन, वणी, जि.यवतमाळ यांच्यावरील कसूरी सिध्द् झाल्याने, त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे अंतिम आदेश क्र.डीपी/३१-बी-२/१४८४ मोहाडे, २५१९ शेंडे/अं.आ./३७२१/२०१९, दि.२७/०३/२०१९ अन्वये **"रु.१०००/- आर्थिक दंड"** ही शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुध्द अपिलार्थी यांनी अपिल अर्ज सादर केला असता, अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती अपिल आदेश क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/पोना-मोहाडे, पोशि-शेंडे/२०१९/३३६१, दि.२३/०७/२०१९ अन्वये पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे दिनांक २७/०३/२०१९ अन्वये **"रु.१०००/- आर्थिक दंड"** ही शिक्षा कायम केलेली आहे. सदर शिक्षेने व्यथित होवून अपिलार्थी यांनी दि.२७/०९/२०१९ अन्वये या कार्यालयास मार्फतीने विहीत मुदतीत फेर अपिल अर्ज सादर केला आहे.

-: **अपिलार्थी यांचे विवेचन** :-

३. **अपिलार्थी पोना.१४८४/रत्नपाल मोहाडे, नेम. पोलीस स्टेशन, वणी, जि.यवतमाळ यांनी दि.२७/०९/२०१९ च्या फेर अपिल अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,**

दि.२८/०१/२०१९ रोजी पोलीस स्टेशन, वणी चे आवारात येवून दक्षत हॉल, क्राईम रुम, मतदगार कक्ष, तपासी अमंलदार कक्षाची विनापरवाना शुटींग घेणारे झी न्युज चे प्रतिनीधी श्रीकांत राऊत व कॅमेरामॅन नितीन राऊत यांना कशाची शुटींग घेत आहे असे विचारले असता, कॅमेरामॅनने कॅमेरा लपविला त्यामुळे सदरचा इसम त्यांना संशयीत वाटल्याने, त्यांच्या जवळ उभ्या असलेल्या इसमांस त्यांनी नाव विचारले असता, त्यांनी श्रीकांत राऊत असे नाव जोराने बोलुन उध्दट शब्दात बोलले व शुटींग करणारे कॅमेरामॅन यांस विचारले असता, श्रीकांत राऊत यांनी याला काही सांगु नका हा कोण होतो आपल्याला नाव विचारणारा अशा उध्दट शब्दात बोलला व तुझा ड्रेस कुठे आहे असे म्हणून वाद घातला. त्यांना विचारपुस करीत असतांना पोलीस स्टेशनचे आवरातील तसेच त्यांचे बोलचालीची शुटींग घेणे सुरुच होते. त्यांना शुटींग घेवू नका असे सांगितले, तरी त्यांची शुटींग सुरुच असल्याने त्यांनी त्यांस पकडून दक्षत हॉल मध्ये घेवून जात असतांना श्रीकांत राऊत यांनी मोबाईल द्वारे शुटींग घेत असतांना ते ऐकत नसल्याने त्यांनी त्यांचे सहकारी पोकॉ.२५१९/ अजय शेंडे यांनी श्रीकांत राऊत यांस मोबाईलवर शुटींग घेवू नका असे सांगितले तरी त्यांचे न ऐकता त्यांना ढकलून दिले. तसेच सदर प्रकरणाची क्लीप तयार करुन प्रसार माध्यमात व युटूबवर व्हायरल केली. तसेच पोलीस स्टेशन वणी हे नक्षलग्रस्त असल्याने व पोलीस स्टेशनचे सुरक्षेच्या दृष्टीने दि.२८/०१/२०१९ रोजी त्यांना विचारपुस केली होती. तसेच त्यांनी १२ वर्षे सेवाकालावधी अनाधिकृतपणे गैरहजर राहिले नाही तसेच कोणाशी असभ्य वर्तन केले नाही. तरी त्यांनी सदरची शिक्षा माफ होणेस विंनती केली आहे.

-: **निष्कर्ष** :-

४. **एकंदरीत** अपिलार्थी यांनी फेर अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे, त्यावर पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेली निराकरण टिप्पणी, तसेच कसूरीची कागदपत्रे इत्यादींचे बारकाईन अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी फेर अपिल अर्जात उपस्थित केलेले मुद्दे समर्थनिय वाटतात. यास्तव शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे अपिल आदेशामध्ये कायम केलेली **"रु.१०००/- आर्थिक दंड"** ही शिक्षा न्यायिक नसल्याच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

**-: फेर अपिल आदेश :-**

५. मी, संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई या आदेशाव्दारे पोना.१४८४/रत्नपाल मोहाडे, नेम.पोलीस स्टेशन, वणी, जि.यवतमाळ यांची शिक्षा **“रद्द ”** करीत आहे.

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोना.१४८४/रत्नपाल मोहाडे,
नेम. पोलीस स्टेशन, वणी, जि.यवतमाळ,
(मार्फत- पोलीस अधीक्षक, यवतमाळ)

क्रमांक :- डीपी/३१-बी/-फेरअपिल अं.आ./ 1460 /२०१९ यवतमाळ दि. 1 FEB 2020

संदर्भ :- पोमस यांचे आदेश क्र.
पोमसं/१३/२२/१२(शर्मा-यवतमाळ)/०८/२०२० मुंबई दि.२१/१/२०२०

विषय :- फेर अपिल अंतिम आदेश तामिल बाबत
पोहवा/१५६५ सुशिल शर्मा,नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ

-----ooo-----

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, पोहवा/१५६५ सुशिल शर्मा,नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा यांना पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील वरील संदर्भानुसार फेरअपिल अंतिम आदेश तामील करीता प्राप्त झालेली आहे.सोबत फेर अपिल आदेशाच्या दोन प्रती पाठविण्यात येत आहे. प्रभारी अधिकारी यांनी मुळ प्रत पोहवा/१५६५ सुशिल शर्मा यांना त्वरीत अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घ्यावी.सदरची **दुय्यम प्रत दिनांकीत स्वाक्षरीसह ०३ दिवसाचे आत या कार्यालयास** त्वरीत सादर करावी.

सहपत्र :- फेर अपिल अंतिम आदेश प्रत.

(पी.के.गिरोलीकर)
प्र. कार्यालय अधिक्षक,
पो.अ.कार्या.यवतमाळ

प्रति,

पोहवा/१५६५ सुशिल शर्मा,नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा
मार्फत - प्रभारी अधिकारी,पो.स्टे.पांढरकवडा

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत → वेतन लिपिक/ ओपीजी लिपिक / (आस्थ) लिपीक/
सआलि - ४ यांना माहितीस व उचित कार्यवाहीस

क्रमांक : पोमसं/१३/२२/१२(शर्मा-यवतमाळ)/०८/२०२०                    मुंबई, दिनांक - २१/०१/२०२०.

वाचा :- १) पोहवा.१५६५/सुशिल शर्मा, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांच्या कसूरीची कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे अंतिम आदेश क्र.डीपी/३१-बी-२/१६९७ पवार, १५६५ शर्मा/अंआ/१२७५९/२०१८, दि.२८/०९/२०१८.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपिल आदेश अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/पोशि-१५६५ सुशिल शर्मा/४९/२०१९/२९४३, दि.०९/०७/२२०१९.

४) पोहवा.१५६५/सुशिल शर्मा, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांचा दि.०९/०९/२०१९ चा फेर अपिल अर्ज.

********

-: कसूरी :-

आपण दुरक्षेत्र पाटणबोरी येथे अमंलदार म्हणून कार्यरत आहे. आपणांस वारंवार दि.११.०८.२०१७, दि.२९.०९.२०१७, दि.२६.१०/२०१७ व दि.२९.११.२०१७ रोजी लेखी आदेश देवून अवैध दारु विक्री व वरली मटका, जुगाराची गोपनिय माहिती काढुन समुळ उच्चाटन करावे असे लेखी आदेश देण्यात आले आहे. दि.०५.१२.२०१७ रोजी आम्ही आपले दुरक्षेत्र व बिट परिसरात गोपनिय माहिती काढून छापे व कार्यवाही करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

दि.०६.१२.२०१७ रोजी आमचे पथकाद्वारे स.पो.नि.पतंगे व स्टाफसह दुरक्षेत्र पाटणबोरी येथे वरली मटका, जुगार धंदयावर छापा मारुन दोन आरोपींना पकडून त्यांचे विरुध्द पो.स्टे.ला अप.क्र.९२८/१७ कलम १२ (अ) मुं.जु.का. मध्ये वरली मटका साहित्य व नगदी रु.११४०/- व अप.क्र.९२९/१७ कलम १२ (अ) मुंबई पोलीस कायदा गुन्हयामध्ये वरली मटका साहित्य व नगदी रु.१४७/- असा एकूण रु.२५९०/- चा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करुन गुन्हे नोंद केले आहे. यावरुन वरिष्ठांनी अवैध धंद्याबाबत समुळ नष्ट करण्याबाबत वारंवार दिलेल्या आदेशाकडे व सुचनाकडे दुर्लक्ष करुन सदर अवैध धंद्यांना मुक संमती असल्याचे निदर्शनास येते.

२. अपिलार्थी पोहवा.१५६५/सुशिल शर्मा, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांच्यावरील कसूरी सिध्द् झाल्याने, त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे अंतिम आदेश क्र.डीपी/३१-बी-२/१६९७ पवार, १५६५ शर्मा/अंआ/१२७५९/२०१८, दि.२८/०९/२०१८ अन्वये **"एक वर्ष वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुध्द अपिलार्थी यांनी अपिल अर्ज सादर केला असता, अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी अपिल आदेश क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/पोशि-१५६५ सुशिल शर्मा/४९/२०१९/२९४३, दिनांक ०९/०७/२०१९ अन्वये अपिल फेटाळून शिक्षा कायम केलेली आहे. सदर शिक्षेने व्यथित होवून अपिलार्थी यांनी दि.०९/०९/२०१९ अन्वये या कार्यालयास मार्फतीने विहीत मुदतीत फेर अपिल अर्ज सादर केला आहे.

-: अपिलार्थी यांचे विवेचन :-

३. अपिलार्थी पोहवा.१५६५/सुशिल शर्मा यांनी त्यांच्या दिनांक ०९/०९/२०१९ च्या फेर अपिल अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,

(१)अपिलार्थी यांना दुरक्षेत्र पाटणबोरी येथे नियुक्त करण्यात आले. तसेच त्यांच्या हद्दीत २१ गावाचे कामकाज होते. दुरक्षेत्राचे नियुक्तीच्या वेळी पोलीस निरीक्षक साहेबांनी वरली, मटका, जुगार चालणार नाही असे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी पुर्णत: वरली, मटक्याचे व्यवसाय बंद केले. तरी काही जुगार चालविणारे लपुन छपुन वरली मटक्याचा व्यवसाय करतात त्यावरुन अपिलार्थी यांनी माहिती काढुन वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे. सन २०१७ मध्ये वरली मटक्याचे केसेस करुन जुगार खेळविणारे लोकांना पकडुन त्यांचे कडून वरली, मटक्याचे साहित्य जप्त केले. अपिलार्थी यांनी सन - २०१७ मध्ये दुरक्षेत्र पाटणबोरी येथे नियुक्त असतांना ०७ केसेस करुन रु.११,९७० जप्त केले. तसेच दि.०६/१२/२०१७ रोजी स्था.गु.शा., यवतमाळ येथील स.पो.नि. पतंगे साहेब व स्टॉफसह पाटणबोरी येथे वरली, मटक्याचे रेड करुन आरोपी विरुदा पोलीस स्टेशनला गुन्हे नोंद केले. त्याच दिवशी दि.०६/१२/२०१७ रोजी पोलीस स्टेशनची गणना करुन पाटणबोरी येथे गेले असता, काही लोक लपुन छपुन वरली मटका खेळवित होते अशी माहिती मिळताच अपिलार्थी यांनी ना.पो.कॉ.२०११/ पठाण सह जावुन खबरेप्रमाणे बरील मटक्यावर रेड करुन ओरापी विरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हे नोंद केले. ज्या दिवशी स्था.गु.शा., यवतमाळ येथील अधिकारी यांनी रेड केली त्याच दिवशी त्यांनी सुध्दा वरली, मटक्यावर रेड केले आहे. त्यापुर्वी वरली मटक्याचे त्यांचे चार महिण्याचे काळात पुर्णत: बंद होते. वरली, मटका व्यवसाय सुरु केले आहे अशी मुखबीर यांचे कडून माहिती मिळताच त्यांनी मटका चालविणारे मालक व नोकर यांचेवर प्रभावी कार्यवाही केली आहे.

(२) सन -२०१४ मध्ये अपिलार्थी पाटणबोरी येथे बदलुन आल्यावर पो.नि. खान साहेब यांचे सोबत काम करीत असतांना काही कारणास्तव मतभेद झाले होते. त्यानंतर त्यांनी अपिलार्थी यांना काढून पाटणबोरी दुरक्षेत्र येथे दिले पण त्यांनी राग मनात ठेवला व त्यानंतर पोटणबोरी दुरक्षेत्र येथील वरली मटक्याचे व्यवसाय पुर्णत: बंद होते त्याला त्यांची मुक संमती नव्हती. दि.०६/१२/२०१७ रोजी रेड झाल्याने पोलीस अधीक्षक साहेब त्यांच्यावर कार्यवाही करतील म्हणून त्यांचा बचाव करण्यासाठी त्यांनी अपिलार्थी यांचा रिपोर्ट पाठविला. तसेच अपिलार्थी यांनी केलेल्या कार्यवाहीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले व त्यांचा
खुलासा न घेता कसूरी अहवाल पाठविला.

(३)अपिलार्थी यांना २९ वर्षाच्या सेवाकालावधीत बरीचशी बक्षिसे मिळालेली असून, त्यांनास वार्षिक निरीक्षणाच्या वेळी सिट रिमार्क मध्ये बरेच रिमार्क **(A+ ) (A)** असे दिलेले आहे. तसेच त्यांना आतापर्यंत कोणतीही शिक्षा झालेली नाही. अपिलार्थी यांना गणपती उत्सव, दुर्गादेवी उत्सव असल्याने व सततचे बंदोबस्तामुळे व त्यांच्याकडील प्रलंबित तपासामुळे नजर चुकीने कारणे दाखवा नोटीसला उत्तर सादर केलेले नाही. तसेच दि.२३/११/२०१८ रोजी उत्तर सादर केलेले आहे.

(४)दुरक्षेत्र पाटणबोरी येथे १ अधिकारी, २ पोहेकॉ व २ कर्मचारी नियुक्त असून त्यापैकी फक्त ०२ पोहेकॉ यांचा कसूरी अहवाल पाठविला आहे. दुरक्षेत्र पाटणबोरी येथे ४२ गावे असून, कामाच्या हिशोबाने प्रभारी अधिकारी

अधिकारी यांनी बिटचे विभाजण केले आहे. स्था.गु.शा. यवतमाळ येथील पथकाने वरली मटक्यावर रेड केली तो भाग अपिलार्थी यांचेकडे येत नाही. सदर शिक्षेमुळे त्यांचे महिण्याला जवळपास रु.१,५००/-रुपये व वार्षिक अंदाजे रु.२०,०००/- आर्थीक नुकसान झाले आहे. तसेच सदर शिक्षेमुळे त्यांचे सेवापुस्तक खराब झाले आहे. तरी अपिलार्थी यांनी सहानुभूतीपुर्वक विचार करुन शिक्षा माफ होणेस विनंती केली आहे.

**-: निष्कर्ष :-**

४. **एकंदरीत** अपिलार्थी यांनी फेर अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे, त्यावर पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेली निराकरण टिप्पणी, तसेच कसूरीची कागदपत्रे इत्यादींचे बारकाईने अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी वरिष्ठांच्या आदेश / सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांचे दूरक्षेत्र व बिट परिसरात अवैध धंदे चालू असल्याने सदर ठिकाणी छापे मारले असता, त्यामध्ये मटका साहित्य व नगद आरोपींकडून जप्त करण्यात आला आहे. यावरुन अपिलार्थी यांची कसूरी सिध्द होत आहे. तथापि, सदर कसूरीसाठी त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे अपिल आदेशामध्ये कायम केलेली **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा कसूरीच्या मानाने जास्त असल्याने त्यात सौम्यता आणण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

**-: फेर अपिल आदेश :-**

५. मी, संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई या आदेशाव्दारे पोहवा.१५६५/सुशिल शर्मा, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे अंतिम आदेशान्वये दिलेली व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी अपिलामध्ये कायम केलेली **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा कमी करुन त्यांना **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता स्थगिती (अपरिणामकारक)"** ही शिक्षा देत आहे.

६. अपिलार्थी यांनी अपिलाच्या दोन संधी उपभोगलेल्या असल्याने, त्यांना सदर आदेशाविरुध्द शासनाकडे अपिल अनुज्ञेय नाही.

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोहवा.१५६५/सुशिल शर्मा,
नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ
**(मार्फत- पोलीस अधीक्षक, यवतमाळ)**

१५६१

क्रमांक :- डीपी/३१-बी/ फेरअपिल अं.आ./ /२०१९ यवतमाळ दि. 1 FEB 2020

**संदर्भ :-** पोमस यांचे आदेश क्र.
पोमसं/१३/२२/१२(हेपट-यवतमाळ)/०६/२०२० मुंबई दि.२१/१/२०२०

**विषय :-** फेर अपिल अंतिम आदेश तामिल बाबत
**पोशि/२३३६ भानुदास देविदास हेपट ,नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ**

-----ooo-----

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, **पोशि/२३३६ भानुदास देविदास हेपट,नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा** यांना पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील वरील संदर्भानुसार फेरअपिल अंतिम आदेश तामील करीता प्राप्त झालेली आहे.सोबत फेर अपिल आदेशाच्या दोन प्रती पाठविण्यात येत आहे. प्रभारी अधिकारी यांनी मुळ प्रत पोशि/२३३६ भानुदास हेपट यांना त्वरीत अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घ्यावी.सदरची **दुय्यम प्रत दिनांकीत स्वाक्षरीसह ०३ दिवसाचे आत या कार्यालयास** त्वरीत सादर करावी.

सहपत्र :- फेर अपिल अंतिम आदेश प्रत.

(पी.के.गिरोलीकर)
**प्र. कार्यालय अधिक्षक,**
**पो.अ.कार्या.यवतमाळ**

प्रति,

**पोशि/२३३६ भानुदास देविदास हेपट,नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा**

मार्फत - प्रभारी अधिकारी,पो.स्टे.पांढरकवडा

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत - वेतन लिपिक / डीपीजी लिपिक / (आस्था) लिपिक / मआली ... यांना माहितीस व उचित कार्यवाहीस

क्रमांक : पोमसं/१३/२२/१२(हेपट-यवतमाळ)/०६/२०२०

मुंबई, दिनांक - २१ /०१/२०२०.

वाचा :- १) पोशि.२३३६/भानुदास देविदास हेपट, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांच्या कसूरीची कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे अंतिम आदेश क्र.डीपी/३१-बी/२३३६ हेपट /कसुरी/१२५१८/२०१८, दि.२४/०९/२०१८.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपिल आदेश अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/पोकॉ-२३३६ हेपट/५०/२०१९, दि.०४/०७/२०१९.

४) पोशि.२३३६/भानुदास देविदास हेपट, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांचा दि.०९/०९/२०१९ चा फेर अपिल अर्ज.

********

-: कसूरी :-

आपण पो.स्टे. पांढरकवडा येथे पोलीस कर्मचारी यांचे पगारपट व इतर बिल मागील ३ वर्षापासून तयार करुन पोलीस अधीक्षक, कार्यालय येथे दाखल करीत आहे. आपण दि.२२/०२/२०१८ व दि.२३/०२/२०१८ रोजी माहे फेब्रुवारी २०१८ चे पगारपट बिल दाखल करण्यास रवाना होवून पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस कर्मचा-यांचे बिल दाखल केले नाही. त्यामुळे पोलीस कर्मचारी यांनी वरिष्ठांजवळ तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. दि.०९/०३/२०१८ रोजी पोशि/१८९९ माधुरी यांनी पो. अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथे बिल दाखल केले. वरिष्ठांना याबाबत कोणतीही सुचना न देता चुकीची माहिती म्हणून बिल दाखल झाल्याचे कळविण्यात आले. तसेच प्रकरणी विचारणा केली असता, वरिष्ठांना उध्दटपणाचे वर्तन केले.

२. अपिलार्थी पोशि.२३३६/भानुदास देविदास हेपट, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांच्यावरील कसूरी सिध्द् झाल्याने, त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे अंतिम आदेश क्र.डीपी/३१-बी/२३३६ हेपट /कसुरी/१२५१८/२०१८, दि.२४/०९/२०१८ अन्वये दिलेली **"दोन (२) वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुध्द अपिलार्थी यांनी अपिल अर्ज सादर केला असता, अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती अपिल आदेश क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/पोकॉ-२३३६ हेपट/५०/ २०१९, दि.०४/०७/२०१९ अन्वये पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे दिनांक २४/०९/२०१८ अन्वये **"दोन (२) वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा कायम केलेली आहे. सदर शिक्षेने व्यथित होवून अपिलार्थी यांनी दि.०९/०९/२०१९ अन्वये या कार्यालयास मार्फतीने विहीत मुदतीत फेर अपिल अर्ज सादर केला आहे.

**-: अपिलार्थी यांचे विवेचन :-**

**३. अपिलार्थी पोशि.२३३६/भानुदास देविदास हेपट यांनी त्यांच्या दिनांक ०९/०९/२०१९ च्या फेर अपिल अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,**

(१)अपिलार्थी हे दिनांक २१/१२/२०१४ पासून पोलीस शिपाई या पदावर कार्यरत असून, मा. पोलीस निरीक्षक, पांढरकवडा यांचे तोंडी आदेशाने दि.२७/०३/२०१९ पासुन बारनिशी मदतगार म्हणून काम पाहतात. दि.२०/०२/२०१८ अन्वये पोलीस अधीक्षक यांचे बिनतारी संदेशानुसार दि.२७/०३/२०१९ पासुन बारनिशी मदतगार म्हणून काम पाहतात. दि.२०/०२/२०१८ अन्वये पोलीस अधीक्षक यांचे बिनतारी संदेश प्राप्त झाल्याने, दि.२२/०२/२०१८ व दि.२३/०२/२०१८ रोजी अपिलार्थी यांनी पोलीस निरीक्षक यांचे आदेशाने नोटींग करीत व ऑनलाईन पगारपट दाखल करणेकरीता पोलीस अधीक्षक कार्यालय येथे आले. दिनांक २२/०२/२०१८ रोजी ते नोंटीग घेवून पोलीस स्टेशनला परत आले. तसेच दि.२३/०२/२०१८ रोजी ऑनलाईन पगारपट दाखल करणेकरीता आले असता, पोलीस अधीक्षक कार्यालयातील पगारपट दाखल करणारे संबधीत यांनी आयकरचे काम चालु आहे व साईड काम करीत नाही, त्यामुळे दोन- तीन दिवसांची या असे म्हणाले. या कारणामुळे दि.२३/०२/२०१८ रोजी पगारपट दाखल करु शकले नाही. सदरबाबत त्यांनी पोलीस स्टेशनचे डयुटी मदतगार यांना सांगितले. त्यांच्याकडे कर्मचारी उपलब्ध नसल्याने त्यांनी दि.२४/०२/२०१८ रोजी १४.०० ते २०.०० वा पावेतो त्यांची वायरलेस डयुटी लावली व दिनांक २५/०२/२०१८ रोजी सकाळी ०८.०० ते १४.०० वा. पावेता तसेस २०.०० ते दि.२६/०२/२०१८ चे सकाळी ०८.०० वा.पावेतो वायरलेस डयुटी केली तसेच दि.२६/०२/२०१८ रोजी विपोमनि, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे वार्षिक निरीक्षण असल्याने, त्यांची सलामी गार्ड डयुटी नेमण्यात आली. सदर कालावधीत ते पगारपट दाखल करण्यास येवू शकले नाही.

(२) दिनांक २६/०२/२०१८ चे रात्री दरम्यान पोलीस निरीक्षक यांनी अपिलार्थी यांना पोलीस स्टेशनचे डयुटी मदतगार रजेवर जात आहेत. उदया पासून ४ ते ५ दिवस डयुटी रजिस्टर सांभाळ असे म्हटल्याने ते पोलीस स्टेशन पगारपट दाखल होणे बाकी आहे असे सांगितले. पोलीस निरीक्षक यांनी किती दिवस लागतील पगारपट तयार करायला असे विचारले असता, २ दिवस लागतील असे सांगितले. त्यानुसार त्यांनी डयुटी मदतगार आलेवर पगारपट दाखल करायला जा असे म्हटल्याने त्यांचे तोंडी आदेशाचे पालन करुन दि.२७/०२/२०१८ पासुन डयुटी लावण्याचे काम केले.

(३)दि.०८/०३/२०१८ रोजी पगारपट दाखल करणेकरीता बिनतारी संदेश प्राप्त झाल्याने, पोलीस निरीक्षक यांनी अपिलार्थी यांना बोलावून तु पगारपट दाखल केला नाही का असे विचारले असता, त्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करीत कर्तव्य बजावले असे बोलले. तेव्हा तुझ काम नाही का मला सांगायच असे म्हटले असता, अपिलार्थी यांनी त्यांना पगारपट दाखल करण्यासंबंधी माहिती वारंवार लक्षात आणुन दिली होती. परंतु सदरची बाब त्यांनी गांभीर्याने घेतली नाही. मपोशि/ माधुरीला पगारपट करता येते का असे विचारले वरुन त्यांना येते असे सांगितले. त्यानंतर दि.०९/०३/१८ रोजी मपोशि/ माधुरी यांना पगारपट दाखल

करण्याकरीता रवाना केले. अपिलार्थी यांची ९वर्षे सेवा झालेली असून, त्यांना सदर सेवा काळात कोणत्याही प्रकारची सेवेमध्ये कसूरी केली नाही. तरी अपिलार्थी यांनी शिक्षा माफ होणेस विनंती केली आहे.

**-: निष्कर्ष :-**

४. **एकंदरीत** अपिलार्थी यांनी फेर अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे, त्यावर पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेली निराकरण टिप्पणी, तसेच कसूरीची कागदपत्रे इत्यादींचे बारकाईन अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी कसूरी केल्याचे कसूरी अहवालावरुन सिध्द होते आहे. तथापि, अपिलार्थी यांना त्यांच्या कसूरीसाठी देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये **"देय वार्षिक वेतनवाढ २ वर्ष रोखणे "** ही शिक्षा प्रस्तावित केली होती. त्यामध्ये परिणामकारक किंवा अपरिणामकारक असा काहीही उल्लेख करण्यात आलेला नव्हता. तथापि, अंतिम आदेशान्वये **"दोन (२) वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा दिली आहे. यास्तव शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे अपिल आदेशामध्ये कायम केलेली **"दोन (२) वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)"** ही शिक्षा कमी करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

**-: फेर अपिल आदेश :-**

५. मी, संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई या आदेशाव्दारे पोशि.२३३६/भानुदास देविदास हेपट, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेल्या व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे अपिल आदेशामध्ये कायम केलेल्या **"दोन (२) वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)"** या शिक्षेत अंशत: बदल करुन **"दोन (२) वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगिती (अपरिणामकारक)"** ही शिक्षा देत आहे.

६. अपिलार्थी यांनी अपिलाच्या दोन संधी उपभोगलेल्या असल्याने, त्यांना सदर आदेशाविरुध्द शासनाकडे अपिल अनुज्ञेय नाही.

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोशि.२३३६/भानुदास देविदास हेपट, नेम. पोलीस स्टेशन पांढरकवडा, यवतमाळ.
**(मार्फत- पोलीस अधीक्षक, यवतमाळ)**

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

**बिनतारी संदेश**

**प्रति** - ठाणेदार, पोस्टे. आर्णी/प्रभारी अधिकारी, महामार्ग पोलीस केंद्र उमरखेड/ करंजी
**पासुन** - **पोलीस अधीक्षक, यवतमाळ**
**हस्ते** - पोउपअधी.(मुख्या)/प्र. अधि. जिविशा./प्रवासभत्ता लिपीक/डिपीजी लिपीक

**क्रमांक-पोअय/आशा/प्रशि/वाहतूक प्रशि./ 1453 /२०२० यवतमाळ** **दि.- ०१/०२/२०२०**

पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ येथे दि. ०३/०२/२०२० ते दि. ०८/०२/२०२० या कालावधीत आयोजित **वाहतूक प्रशिक्षण सत्र क्र. ०९** करीता खालील नमुद पो. कर्मचारी यांची निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचाऱ्यांची नावे | नेमणुक | प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | पोना/२००७, प्रशांत सराटे | म.पो. केंद्र करंजी | निवड |
| ०२ | पोना/२४३७, दिनेश चव्हाण | म.पो. केंद्र उमरखेड | निवड |
| ०३ | पोशि/१७४२, रविंद्र महल्ले | म.पो. केंद्र उमरखेड | निवड |

संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी निवड करण्यात आलेले सदर कर्मचारी यांना ते पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ येथे दिनांक ०२/०२/२०२० रोजी सायंकाळी १८.०० वाजता पोहोचतील या बेताने त्यांना मोकळीक करून रू. ९,०००/— रक्कमेच्या धनादेशासह हजर राहणेबाबत तसेच सदर धनादेश पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ यांना अदा केल्याबाबतचे पोहोचपत्र त्यांचेकडुन प्राप्त करून प्रशिक्षणानंतर या कार्यालयात सादर करणेबाबत सुचना द्याव्यात.

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( पी. के. गिरोलीकर )
प्र. कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

(०१) राखीव पोलीस निरीक्षक/ **रोखपाल** पो. मुख्या. यवतमाळ.

२/- सदर प्रशिक्षणाकरीता जाणाऱ्या वरिल पो.कर्म. यांच्या प्रशिक्षण शुल्काची रक्कम प्रत्येकी रूपये ३,०००/— ( तीन हजार मात्र ) प्रमाणे एकुण **रू.९,०००/— ( नऊ हजार मात्र )** रक्कमेचा **" VICE PRINCIPAL POLICE TRAINING CENTRE, MAROL, MUMBAI"** या नावाचा धनादेश प्रशिक्षणाकरीता जाणाऱ्या वरिल पो.कर्म. यांचेकडे सुपुर्द करण्याची कार्यवाही करावी.

प्रत सादर,

(०२) मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
(०३) मा. प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई